# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिति क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ६४४ /२०२३-२४ दिनांक : ०५/१०/२०२३

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) सृष्टी सेक्टर I को.ऑ.हौ.सो.फे.लि. यांचे दि.२४/०८/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | नारळ | ३५ ते ४० फुट | ०१ | २० वर्ष | सदरचे झाड सृष्टी सेक्टर I को.ऑ.हौ.सो.फे.लि.,सृष्टी सेक्टर I,सृष्टी कॉम्पलेक्स,मिरारोड (पु.) येथिल ०१ नग नारळ सोसायटीच्या सुरक्षा भिंतीवरुन वाढलेले आहे.झाड मनपा रोड वर झुकलेल्या अवस्थेत आहे.झाडांची मुळे जमीनीवर आली आहे. तसेच बाजुला शाळा असून मुलाची वर्दळ असते. झाडावरचे नारळ व झावळयां खाली पडत असतात व जोराच्या वाऱ्याने पावसाने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | पाम | ३५ ते ४० फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे झाड सृष्टी सेक्टर I को.ऑ.हौ.सो.फे.लि.,सृष्टी सेक्टर I,सृष्टी कॉम्पलेक्स,मिरारोड (पु.) येथिल सोसायटीच्या आवारात ०१ नग पाम खूप उंच वाढलेले असून झाडाची मुळे जमिनीवर आलेली आहे.झाड पुर्णपणे झुकलेले आहे. झाड सोसायटीच्या गार्डन मध्ये असल्याने सोसायटीच्या रहिवाशांची वर्दळ व लहान मुलांची वर्दळ असते. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही या कारणास्तव झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| **२) मा. कार्यकारी अभियंता (सा.बां) यांचे दि.११/०९/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | पेल्ट्रोफॉर्म | ३५ ते ४० फुट | ०१ | १२ वर्ष | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील काशिमीरा स्मशानभुमी मध्ये अद्यात विद्युत दाहिन्या बसवुन संपूर्ण सुशोभिकरण करणे या विभागामार्फत काम सुरु करायचे आहे.सदर नविन कंपाऊड भिंत बांधण्याच्या कामात नमुद झाडे बाधित होत असून मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | जांभुळ | ४० ते ४५फुट | ०१ | १५ वर्ष | |
| ३ | कडुलिंब | ३० ते ३५ फुट | ०१ | १० वर्ष | |
| ४ | बदाम | २५ ते ३० फुट | ०२ | १० वर्ष | |
| ५ | अशोक | २५ ते ३० फुट | ०१ | ०८ वर्ष | |
| ६ | पिंपळ | २५ ते ३० फुट | ०१ | १० वर्ष | |
| | | **एकूण** | **०७** | | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरक तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(योगेश गुणिजन)**
**सहाय्यक आयुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**